<u>नि.११३ खाली आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ शिवाजी माने यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ प्रमाणे यांनी कैफियत दुरुस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे म्हणणे असे की, त्यांनी नि.६८ ला त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. परंतु सदर कैफियतीमधील कलम १३ मध्ये मिळकतीचे वर्णन ‘ तुकडी-पुणे, पोटतुकडी- ता. भोर मे.सब.रेजिस्ट्रार साहेब यांचे हद्दीतील व भोर नगरपालिका यांचे अखत्यारीतील कब्जे-भोर येथील शेत जमीन सर्वे नं.१८५ हिस्सा नं.३अ१ स्थानिक नाव काळभाई याचे क्षेत्र ०१ हे. २३ आर अधिक पोट खराब ०० हे. ५ आर याचे एकूण क्षेत्र ०१ हे. २८ आर याचा आकार रु.१ पैसे ८१ यापैकी पूर्वेकडील ०० हे. ३५ आर त्यातील ०० हे. ०१ आर क्षेत्रातील वादीचे झोपडीसह याचा आकार ०० रु.५१ पैसे ’ असे दावा मिळकतीचे वर्णन दिलेले आहे.

३. प्रतिवादीचे म्हणणे असे की, उपरोक्त वर्णनामध्ये दावा मिळकतीचे क्षेत्र नजर चुकीने लिहीले गेलेले आहे. वास्तविक प्रतिवादी नं.१ यांचे दावा मिळकतीमध्ये ३ एकर ५ गुंठे इतके क्षेत्र आहे. त्यामुळे सदर वर्णनामध्ये दुरुस्ती करणे जरुरीचे आहे. प्रतिवादीचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने या मिळकतीसंदर्भात दिवाणी न्यायालय, पुणे येथे दिवाणी दावा नं.२०६८/२०१४ दावा दाखल केलेला आहे व त्यामध्ये दावा मिळकतीचे क्षेत्र ०३ एकर ०५ गुंठे असे नमूद केलेले आहे. सदरची दुरुस्ती केल्याने दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. या उलट दुरुस्ती न झालेस प्रतिवादीचे नुकसान होणार आहे.

४. वादी विरुध्द प्रस्तुत अर्जास म्हणणे नाही, असा आदेश पारित करण्यात येत आहे.

५. दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश-६, नियम-१७ प्रमाणे जर एखादी दुरुस्ती दावा निर्णायक करण्याकरीता आवश्यक असेल तर दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर पक्षकार त्यांच्या वाद कथनांमध्ये दुरुस्ती करु शकतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप मुद्दे काढलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादीने मागणी केलेली दुरुस्ती मान्य केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादीस त्याचा बचाव देण्याचा अधिकार आहे. प्रतिवादीने मागणी केलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच सदरची कथने वा दुरुस्ती शाबीत करण्याची जबाबदारी ही प्रतिवादीची असल्याने सदर दुरुस्ती मान्य केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. या उलट सदर दुरुस्ती

नामंजूर केल्यास प्रतिवादीस त्याच्या बचावास मुकावे लागेल. तसेच प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निर्णायक करणे करीता दोन्ही पक्षकारांनी त्यांची कथने मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. अशा परिस्थितीमध्ये न्यायाचे हित ध्यानात घेता. प्रतिवादीस दुरुस्तीची परवानगी देणे उचित होईल. निश्चितच सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे कामकाज प्रलंबीत होवून वादीची गैरसोय होणार आहे. त्याची नुकसान भरपाई वादखर्च देवून करता येईल. त्यामुळे वरील सर्व बाबी ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आला. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आलः

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.११३) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांना रु.३००/- वाद खर्च द्यावे.

सही/-
(ह.उ.उ.पाटील)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : १६/११/२०२१

## Certificate

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.
Name of the Steno : A. A. Shaikh.
Court Name : H.U.U. Patil
2nd Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.
Date : 16/11/2021
Order signed by presiding officer on : 16/11/2021
Order uploaded on : 17/11/2021.